संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# घरात नाही दाणा मला बाजीराव म्हणा

**राज्य** सरकारच्या डोक्यावर पाच लाख कोटींचे कर्ज आणि सध्या स्वतःच्या तिजोरीत ठणठणाट असताना वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी पैसा कसा उभा करायचा याची चिंता राज्य सरकारला आहे. अलिकडेच शिर्डीच्या साई संस्थानकडून पाचशे कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज उचलण्याची वेळ सरकारवर आली आणि तो पैसा नगर जिल्ह्यातल्याच निळवंडे धरण पूर्ण करण्यासाठी वापरण्याचे ठरले. आतादेखील सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे सरकारला तीस हजार कोटींचा ज्यादा बोजा सहन करावा लागणार आहे. मिळेल त्या मार्गाने पैसा उभा करण्याचा खटाटोप राज्य सरकारतर्फे सुरु आहे. आणि म्हणूनच आता भारतीय बनावटीच्या परंतु परदेशी दारूवरच्या अबकारी करात वीस टक्के कर लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामधून महिन्याला दीडशे ते दोनशे कोटी रुपये महसूल मिळवण्याचा राज्य सरकारचा उद्देश आहे. तिजोरीतला खडखडाट कमी करण्यासाठी ही उपाययोजना असल्याचे सांगितले जात असताना दुसरीकडे सरकारची अनावश्यक उधळमाधळही सुरू आहे. आता तर म्हणे मुंबईतल्या नरिमन पॉईंट भागातल्या एअर इंडियाची सतरा मजली इमारत खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने निविदा दाखल केली आहे. स्वतःच्या तिजोरीत पैसा नसताना किंवा सरकारच्या अनेक इमारतींची अत्यंत वाईट अवस्था असताना हा काही हजार कोटींचा जुगार राज्य सरकारने खेळायचे ठरवलेले दिसते. घरात नाही दाणा आणि मला बाजीराव म्हणा अशा पध्दतीचा हा व्यवहार म्हणावा लागेल. तिजोरीतला ठणठणाट आणि अनेक विकास प्रकल्पांसाठी खर्चाला कात्री लावली जात असताना सरकारने अशा प्रकारचे खर्चिक निर्णय का घ्यावेत याबद्दल कोणालाही आश्चर्यच वाटेल. या एअर इंडियाच्या इमारतीसाठी आयुर्विमा महामंडळ आणि महाराष्ट्र सरकार अशा दोघांच्याच निविदा आल्या आहेत. यापूर्वी जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टने या इमारतीच्या खरेदीसाठी स्वारस्य दाखवले होते. मात्र आता अचानकपणे महाराष्ट्र सरकारला डबघाईला आलेल्या एअर इंडियाच्या मदतीला धावून जाण्याची इच्छा का व्हावी हेही एक मोठे कोडेच आहे. याचा खुलासा सरकारने केला पाहिजे. कारण ही अगडबंब इमारत घेऊन राज्य सरकार कोणता हेतू साध्य करणार आहे किंवा सरकारकडे अशी कोणती मोठी महत्वाकांक्षी योजना आहे की ज्यासाठी सरकारला इतक्या मोक्याच्या जागेवरच्या आणि महागड्या इमारतीची आवश्यकता भासावी. एअर इंडियाला या इमारतीमधून किमान पंधरा हजार कोटी मिळावे अशी अपेक्षा आहे.

### दुष्काळासाठी पैसा नाही

राज्य सरकारच्या बिकट आर्थिक परिस्थितीचे चटके सामान्य जनतेलाही सोसावे लागत आहेत. कारण अनेक कल्याणकारी योजनांसाठी पैसा उपलब्ध नाही. राज्यातील शिक्षण संस्थांना वेळेवर अनुदान मिळत नाही. शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत. अंगणवाडी शिक्षकांना पगारवाढ द्यायची सरकारची इच्छा नाही. सातव्या वेतन आयोगाचे पैसे देतानाही गेल्या दोन वर्षाची थकबाकी त्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. पण त्यातून कोणत्याही कर्मचाऱ्याला पैसा वापरता येणार नाही अशी अटही घातल्याचे कळते. इतकेच नव्हे तर राज्यातील अनेक जलसिंचन योजना अर्धवट अवस्थेत आहे. दुष्काळाचे संकट गंभीरपणे घोंगावत असताना मदतीसाठी पैसा नाही. केंद्र सरकारने राज्याला तीस हजार कोटींची मदत द्यावी अशी याचना करणे सुरु आहे. केंद्राने अजून तरी मदतीचा हात दिलेला नाही. राज्यातील आरोग्य व्यवस्थाच सध्या मरणपंथाला आहे. अनेक ठिकाणी औषधांचा तुटवडा जाणवतो. औषध पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांची थकबाकी वाढल्याने मध्यंतरीच्या काळात त्यांनी औषधांचा पुरवठाच बंद केला होता. अशी आर्थिक ओढाताण चालू असतानाच सरकार दिवाळखोर एअर इंडियाच्या मदतीला धावून जात असेल तर नागड्याजवळ उघड्याने जाण्यासारखे म्हणावे लागते. एअरइंडियाला अशाप्रकारे मदत करीत असताना नरिमन पॉईंट भागातली ती दिमाखदार इमारत आपल्या मालकीची असावी असे सरकारला वाटू शकते. परंतु हा सगळा व्यवहार करण्यापूर्वी त्यामागचा उद्देशही स्पष्ट होणे गरजेचे ठरते. कारण याच भागामध्ये राज्य सरकारची सत्तर टक्के कार्यालये केंद्रीत झाली आहेत. मंत्रालय, नवीन प्रशासकीय भवन, विधानभवन, आमदारनिवास मंत्र्यांचे बंगले , शासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने , राजभवनचा प्रचंड परिसर असा सगळा पसारा असताना नव्या इमारतीच्या खरेदीची कारणे समोर येणे गरजेचे ठरते.

### आहे त्याच इमारती दुरुस्त करा

खरे सांगायचे तर एका नव्या इमारतीच्या खरेदीसाठी काही हजार कोटी खर्च करण्यापेक्षा सरकारच्या सध्याच्या इमारतींची परिस्थिती सुधारणे जास्त आवश्यक आहे. मंत्रालयाला अगदी कॉर्पोरेट ऑफिसचे स्वरुप दिले जात असताना प्रत्यक्षात तिथे असणारा अजागळपणा पूर्वीसारखाच कायम आहे. ई गव्हर्नन्सचा ढोल बडवला जात असतानाही ठिकठिकाणी दिसणारे फाईलीचे ढिगारे जुन्या फर्निचरचा कोपऱ्या कोपऱ्यात दिसणारा कचरा यामधून सरकारच्या स्वच्छता मोहिमेलाही हरताळ फासण्याचा उद्योग याच मंत्रालयात पाहायला मिळतो. एवढेच कशाला राज्य सरकारची दोन मोठी रुग्णालये दक्षिण मुंबईत आहेत. सेंट जॉर्ज आणि जे जे रुग्णालयाची अवस्थादेखील अतिशय वाईट आहे. तिथल्या निवासी डॉक्टरांच्या खोल्या किंवा रुग्णांसाठी असलेल्या अनेक विभागांमध्ये असलेल्या गैरसोयी दूर करण्यावर राज्य सरकारने लक्ष द्यायला हवे. कदाचित या नव्या इमारतीवर पैसा खर्च करण्यामागे सरकारचा उद्देश असू शकतो. कदाचित अख्खे मंत्रालय तिथे हलवले जाऊ शकते किंवा सह्याद्रीसारखे नवे अतिथीगृह तिथे सुरु करण्याची सरकारची कल्पना असू शकते. मात्र याचा कोणताच उलगडा झालेला नाही. अशा परिस्थितीत एवढा मोठा खर्च पेलण्यासाठी आणि करण्यासाठी सरकार पैशाची उभारणी कुठून करणार आहे, हेदेखील स्पष्ट झालेले नाही.